# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स :(०२२) ६९९६५५९९ ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**


==========================================

## -: जाहिरात :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामार्फत राज्यातील विविध ठिकाणी आणि मुंबई महानगर प्रदेश अंतर्गत येणाऱ्या विविध शासकीय व इतर औद्योगिक, व्यवसायिक आस्थापनांना सशुल्क सुरक्षा व्यवस्था देण्यात येते. यापैकी काही आस्थापनांमध्ये सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) आणि पोलीस निरीक्षक (PI) आणि सहा. पोलीस निरिक्षक (API) दर्जाचे अधिकारी यांची सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO) या पदांकरीता कंत्राटी तत्वावर नियुक्तीसाठी याव्दारे इच्छुक व पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सविस्तर जाहिरात यासोबत जोडलेली आहे.

**Sd/-**

**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

**अ) - प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून वेगवेगळया आस्थापनामध्ये पुरविण्यात आलेल्या सुरक्षा कर्मीवर पर्यवेक्षण व इतर कामासाठी सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP), पोलीस निरीक्षक (PI) आणि सहा. पोलीस निरिक्षक (API) दर्जाचे अधिकारी यांना अनुक्रमे सह संचालक (Jt. Director) आणि सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO) या पदावर निवड करणे; तसेच पुढील एक वर्ष कालावधीत राज्यातील विविध ठिकाणी आणि मुंबई महानगर प्रदेश विभागातील (मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड) आस्थापनांकडून नव्याने निर्माण होणाऱ्या पदांवर नियुक्तीसाठी सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) दर्जाचे ०२, पोलीस निरिक्षक (PI) दर्जाचे १६ अधिकारी आणि पोलीस उप निरिक्षक (PSI) दर्जाचे ०१ अधिकारी यांची नामिकासुची याकरीता प्रस्तुत जाहिरात देण्यात येत असून इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

I. **सह संचालक (Jt. Director) - नागपूर विभाग - ०१ पद.**

II. **सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO) - मुंबई शहर - ०१ पद**

III. **सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO) - महामुंबई मेट्रो रेल - ०१ पद**

IV. **सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO) - समृध्दी महामार्ग - ०१ पद.**

- **कार्यालय ठिकाण - इगतपुरी (जिल्हा. नाशिक) व खुटघर (जिल्हा. ठाणे.)**
- **गस्त परिसर - आमने (जिल्हा. ठाणे) ते शिर्डी (जिल्हा. अहिल्यानगर) या दरम्यान समृध्दी महामार्ग.**

V. **प्रतिक्षाधीन यादी तथा नामिकासुची एकूण ०२ पदे (मुंबई शहर - ०१ आणि उरण परिसर - ०१ ) :-** उपरोक्त **अ. क्र. I ते IV** या पदांव्यतिरिक्त Retd. ACP दर्जाचे अधिकारी यांची SSO अशा नव्याने निर्माण झालेल्या / होणाऱ्या पदावर नियुक्तीसाठी अधिकाऱ्यांची नामिकासुची.

**वरील पदांसाठी पात्रता व निकष :-**

**१. किमान आवश्यक पात्रता :-**

- महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून किंवा राज्य राखीव पोलीस बलातून **सहा. पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक (सशस्त्र / नि:शस्त्र)** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी.
- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- वर नमुद पदांसाठी त्या-त्या भागात राहत असलेले व त्याभागात पोलीस खात्यात असताना नोकरी केलेले उमेदवार यांना प्राधान्य देण्यात येईल.

**२. वय :-** दि. ३१.०५.२०२५ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**३. वेतन :- रू. ५०,०००/-**

## ४. पदाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या :-

### १) नागपूर विभाग - सह संचालक (Jt. Director) :-

**या पदांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या खालील प्रमाणे :-**

१. सह संचालक हे संबधीत विभागातील सर्व आस्थापनांचे प्रभारी पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून काम करतील.

२. विभागांतर्गत विविध आस्थापनांमधील कार्यरत सुरक्षा कर्मी यांची कार्यक्षमता, शिस्त इ. विषयक बाबीवर त्यांनी लक्ष द्यावयाचे असून याबाबत वेळोवेळी योग्य ती कार्यवाहीसाठी मुख्यालयास अहवाल पाठविणे.

३. सह संचालक यांनी त्यांच्या विभागातील विविध आस्थापनांना नियमितपणे भेटी द्यावयाच्या आहेत. आस्थापनांचे व्यवस्थापनप्रमुख यांच्याकडून सुरक्षा रक्षकांच्या सेवेबाबत मते / तक्रारी समजून घेऊन त्यानुसार आवश्यक त्या सुचना सुरक्षा रक्षकांना देवून सुरक्षा व्यवस्था मजबूत व सक्षम राहील याची दक्षता घेणे. त्यासाठी व्यवस्थापन प्रमुखाच्या संपर्कात रहाणे.

४. आस्थापनांचे व्यवसाय स्वरूप व इतर बाबी विचारात घेवून सुरक्षा व्यवस्थेचा नियमित आढावा घेणे, आस्थापनांच्या सुरक्षा व संरक्षणात कसुरी असल्यास त्या दूर करण्याबाबत आस्थापना व महामंडळास याबाबत माहिती देवून सुधारणा सुचविणे.

५. स्थानिक पोलीस ठाणे व इतर शासकीय विभाग यांच्याकडून आणिबाणी प्रसंगी तात्काळ मदत मिळावी, या हेतूने त्यांच्याशी स्वत: तसेच आस्थापनांमध्ये पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून काम करत असलेल्या अधिकाऱ्यामार्फत संपर्कात रहावे.

६. आस्थापनांसोबतच्या सुरक्षा सेवेबाबत करावयाचे करार यांचे वेळेवर नुतनीकरणांसाठी आवश्यक ती कामे / पाठपुरावा करणे. त्यासाठी प्रतिष्ठापना विभागाचे प्रमुख यांना सहकार्य करणे.

७. आस्थापनांकडून दरमहा सुरक्षा शुल्क वेळेवर अदा व्हावे, यासाठी पर्यवेक्षकीय अधिकारी यांच्यामार्फतीने आणि वेळ प्रसंगी स्वत: हस्तक्षेप करून प्रयत्न करणे. प्रलंबीत देयक वसुलीसाठी मुख्यालयातील वित्त विभागाशी संपर्कात राहून पाठपुरावा करणे व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.

८. आपल्या विभागातील महामंडळ वादी / प्रतिवादी असलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये महामंडळाच्या वतीने प्रतिनिधीत्व करणे. अशा प्रकरणांचा पाठपुरावा करणे व वरिष्ठांना वेळोवेळी अवगत करणे.

९. विभागांतर्गत व्यवसाय वृध्दीसाठी प्रयत्न करणे. त्यासाठी आस्थापनांना भेटी देणे. महामंडळाच्या सुरक्षा व्यवस्थेविषयी माहिती देणे.

१०. नवीन आस्थापनांचे सुरक्षा ऑडीट करणे व त्याबाबत मुख्यालयास अहवाल पाठविणे.

११. महामंडळाचे सुरक्षा रक्षक प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षण केंद्रावर उपस्थित राहून सहाय्य करणे.

१२. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

**२) <u>१) मुंबई शहर - सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO)</u>**

**<u>२) महामुंबई मेट्रो रेल - सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO)</u>**

**<u>३) समृध्दी महामार्ग (शिर्डी ते आमने) - सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (SSO)</u>**

**<u>या पदांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या खालील प्रमाणे :-</u>**

१. आस्थापनेवर विविध ठिकाणी नियुक्त केलेले महामंडळाचे सुरक्षा कर्मी यांच्यावर दैनंदिन पर्यवेक्षण व नियंत्रण करून आस्थापनेची सुरक्षा व संरक्षणाची जबाबदारी पार पाडणे.

२. आस्थापनेस असलेले संभाव्य धोके यानुसार सुरक्षा कर्मी यांना कायम सतर्क ठेवणे व त्यांच्याकडून कार्यक्षमपणे काम करून घेणे.

३. उत्कृष्ट काम करणारे सुरक्षा कर्मी यांना प्रोत्साहन देणेकामी प्रशंस्तीपत्र / बक्षीसे देण्याबाबत मुख्यालयास अहवाल सादर करणे.

४. कर्तव्यात कसुरी करणारे सुरक्षा कर्मी यांचे कसुरी अहवाल चौकशीअंती कार्यवाहीसाठी मुख्यालयास सादर करणे.

५. सुरक्षा कर्मीची दैनंदिन हजेरी घेणे व त्याची HRMS प्रणालीमध्ये नोंदी घेणे.

६. हत्यारी सुरक्षा रक्षक यांच्याकडील हत्यारांची देखभाल दुरूस्ती विषयक आर्मोरर कडून कामे करून घेणे.

७. आस्थापनेकडून सुरक्षा शुल्क वेळेत वसुल करण्याबाबत कार्यवाही करणे, प्रलंबित देयके संदर्भात उपस्थित अडी - अडचणी याबाबत संबधीत आस्थापना आणि महामंडळाचे मुख्यालय यांच्याशी समन्वय साधून प्रलंबित देयक वसुलीचे काम करणे.

८. त्याचप्रमाणे महामंडळाचे मुख्यालयाकडून सोपविण्यात आलेले अनुषंगिक कामकाज करणे.

९. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

**VI. <u>सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी (Security Supervisory Officer) ०७ पदे :- नोकरीचे ठिकाण, पदासाठीचे वय, किमान अर्हता व निकष खालील प्रमाणे :-</u>**

**१.नोकरीचे ठिकाण (आस्थापना) :- खालील तक्त्यात नमुद प्रमाणे.**

| अ. क्र | आस्थापना | पद संख्या | पोलीस खात्यातील सेवानिवृती पद |
|---|---|---|---|
| १ | औष्णिक विद्युत केंद्र, परळी, जिल्हा - बीड | ०१ | PI |
| २ | मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (भुयारी रेल्वे - ३) | ०१ | PI |
| ३ | महामुंबई मेट्रो | ०२ | PI |
| ४ | सेंट जॉर्ज हॉस्पीटल, सी.एस.एम.टी., मुंबई | ०१ | PI |
| ५ | पुणे महानगरपालिका, पुणे | ०१ | PI |

| अ. क्र | आस्थापना | पद संख्या | पोलीस खात्यातील सेवानिवृत्ती पद |
|---|---|---|---|
| ६ | सावंतवाडी प्रशिक्षण केंद्र, जिल्हा - सिंधुदुर्ग | **०१** | **PI** |
| ७ | **१.** नजीकच्या भविष्यात साधारण पुढील एक वर्षापर्यंत मुंबई शहर (३), पुणे विभाग (सातारा - ०१, पुणे शहर - ०२, सोलापूर - ०१), छत्रपती संभाजी नगर विभाग (लातूर - ०२, परभणी - ०१), नागपूर विभाग (नागपूर - ०३, गोंदिया - ०१, गडचिरोली - ०२) | **१६** | **PI - १६** |
| | **२.** मालेगाव (नाशिक) या ठिकाणी नव्याने निर्माण होणाऱ्या पदावर नियुक्तीसाठी अधिकाऱ्यांची नामिकासुची. | **०१** | **PSI - ०१ (मालेगाव)** |
| | **एकूण** | **२४** | |

**२. किमान आवश्यक पात्रता :-**

- नमुद तक्त्यातील **अ. क्र. ०१ ते ०६** मध्ये नमूद पदांसाठी महाराष्ट्र राज्य पोलीस दलातून किंवा राज्य राखीव पोलीस बलातून **पोलीस निरीक्षक (सशस्त्र / नि:शस्त्र)** किंवा **सहा. पोलीस निरिक्षक (API)** या पदावरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी. उपरोक्त पदांसाठी पोलीस निरिक्षक दर्जाचे उमेदवार यांना प्राधान्य देण्यात येईल. आवश्यक संख्येने पोलीस निरिक्षक उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तरच **सहा. पोलीस निरिक्षक (API)** दर्जाच्या अधिकाऱ्यांचा विचार करण्यात येईल.
- नमूद तक्त्यातील **अ. क्र. ०७ (२)** मध्ये नमूद पदासाठी सेवानिवृत्त **पोलीस उप निरिक्षक** या दर्जाचे अधिकारी.
- किमान शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठातून कोणत्याही शाखेतील पदवी उत्तीर्ण.
- वर नमुद पदांसाठी त्या-त्या भागात राहत असलेले व त्याभागात पोलीस खात्यात असताना नोकरी केलेले उमेदवार यांना प्राधान्य देण्यात येईल.

**३. वय :-** दि. ३१.०५.२०२५ रोजी ६१ वर्षापेक्षा अधिक नसावे.

**४. वेतन :- १) रू. ४५,०००/- (सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक)**
**२) रू. ३५,००० /- (सेवानिवृत्त सहा. पोलीस निरिक्षक / पोलीस उप निरिक्षक)**

**५. सुरक्षा पर्यवेक्षकीय अधिकारी या पदाची अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या :-**

१. आस्थापनामध्ये नियुक्त केलेले महामंडळाचे सुरक्षा कर्मी यांच्यावर दैनंदिन पर्यवेक्षण व नियंत्रण करून आस्थापनेची सुरक्षा व संरक्षणाची जबाबदारी पार पाडणे.

२. आस्थापनेस असलेले संभाव्य धोके यानुसार सुरक्षा कर्मी यांना कायम सतर्क ठेवणे व त्यांच्याकडून कार्यक्षमपणे काम करून घेणे.

३. उत्कृष्ट काम करणारे सुरक्षा कर्मी यांना प्रोत्साहन देणेकामी प्रशंस्तीपत्र / बक्षीसे देण्याबाबत मुख्यालयास अहवाल सादर करणे.

४. कर्तव्यात कसुरी करणारे सुरक्षा कर्मी यांचे कसुरी अहवाल चौकशीअंती कार्यवाहीसाठी मुख्यालयास सादर करणे.

५. सुरक्षा कर्मीची दैनंदिन हजेरी घेणे व त्याची HRMS प्रणालीमध्ये नोंदी घेणे.

६. हत्यारी सुरक्षा रक्षक यांच्याकडील हत्यारांची देखभाल दुरूस्ती विषयक आर्मोरर कडून कामे करून घेणे.

७. आस्थापनेकडून सुरक्षा शुल्क वेळेत वसुल करण्याबाबत कार्यवाही करणे, प्रलंबित देयके संदर्भात उपस्थित अडी - अडचणी याबाबत संबधीत आस्थापना आणि महामंडळाचे मुख्यालय यांच्याशी समन्वय साधून प्रलंबित देयक वसुलीचे काम करणे.

८. त्याचप्रमाणे महामंडळाचे मुख्यालयाकडून सोपविण्यात आलेले अनुषंगिक कामकाज करणे.

९. मा. व्यवस्थापकीय संचालक व इतर वरिष्ठ अधिकारी यांनी प्रसंगोपात दिलेले आदेशानुसार कामे करणे.

**ब) - अर्ज सादर करण्याची पध्दत :-**

**१.** इच्छुक व पात्र उमेदवार / अधिकारी यांनी यासोबतच्या विहित नमुन्यातील आपला अर्ज महामंडळास खालील पत्यावर प्रत्यक्ष हजर राहून किंवा पोस्टाने पाठविण्यात यावेत.

**२. अर्ज सादर करण्याचा पत्ता :-**

**पत्ता :-** पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्डd ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५.

**३. अर्ज सादर करण्याचा कालावधी व मुदत :-**

**दि. २३.०५.२०२५ ते दि. ०६.०६.२०२५ रोजी वेळ १८.०० वाजेपर्यंत.**

**क) - मुलाखतीसाठी हजर रहावयाचे ठिकाण व दुरध्वनी क्र. :-**

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५.

**ड) - मुलाखतीवेळी उमेदवारांनी सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. वैयक्तिक माहिती (BIO-DATA)

२. शैक्षणिक कागदपत्रे

३. सेवानिवृत्त प्रमाणपत्र / सेवानिवृत्ती ओळखपत्र

४. निवृत्ती वेतन पुस्तिकेची प्रत

५. फोटो / पॅन कार्ड / आधार कार्ड

६. मागील पाच वर्षाचे ACR

**इ) - इतर महत्वाच्या सुचना :-**

१. इच्छुक अर्जधारक यांना मुलाखतीपूर्वी महामंडळाबाबत सविस्तर माहिती मिळविण्यासाठी महामंडळाचे संकेतस्थळ https://mahasecurity.gov.in यावर भेट द्यावी.

२. उमेदवारांनी सोबतच्या विहित केलेल्या नमुन्यात त्यांचे अर्ज / BIO-DATA पोस्टाने किंवा प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहून सादर करावेत.

३. उमेदवारांच्या प्राप्त कागदपत्रानुसार मुलाखतीसाठी बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल. किमान अर्हता प्राप्त उमेदवारांना मुलाखतीची वेळ दिनांक याबाबत भ्रमणध्वनीव्दारे कळविण्यात येईल.

४. मुलाखतीसाठी उमेदवारांना स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

५. मुलाखतीसाठी येताना सेवानिवृत्ती ओळखपत्र, पेन्शन पुस्तिका व शैक्षणिक अर्हता विषयक सर्व कागदपत्राच्या मुळ प्रती, BIO-DATA व त्याच्या ०२ छायांकित प्रती आणाव्यात.

६. मुलाखत, अनुभव इ. वर आधारित उमेदवारांची नामिकासुची तयार करण्यात येईल आणि महामंडळात उपलब्ध जागेनुसार या सुचीमधील गुणानुक्रम विचारात घेऊन नियुक्ती दिली जाईल.

७. निवडलेल्या उमेदवारास महामंडळाच्या अटी व शर्तीसह नियुक्ती पत्र दिले जाईल.

८. दिली जाणारी नियुक्ती ही करार पध्दतीने ११ महिन्यासाठी असेल व महामंडळाची आवश्यकता आणि प्रस्तुत कर्मचाऱ्यांची क्षमता, आत्मसात केलेले ज्ञान व इतर निकष यानुसार पुर्ननियुक्ती दिली जाईल.

९. प्रस्तुत जाहिरातीत नमुद करण्यात आलेली पदसंख्या यामध्ये वाढ / घट होण्याची शक्यता आहे.

१०. सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी / कोणत्याही कारणास्तव / कोणत्याही टप्प्यावर / पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

११. उमेदवारांच्या नेमणुकीबाबत अंतिम निर्णय महामंडळाचा असेल.

**Sd/-**
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

# Format for Application:

Attach recent Photography

## Application Form

(Please read the general instructions, Terms & Conditions in the advertisement before filling the form)

To,

The Managing Director,

Maharashtra State Security Corporation,

32 Floor, World Trade Center,

Cuff Parade, Mumbai - 400 005.

**Sub**. : Application for the post of ______________________________.
(Mention the name of post)

**Ref**. : Advertisement dated – **23 / 05 / 2025.**

Sir,

I hereby submit my application for the post of ________________ at ______________ (Place) with the following details:

1. Full name (As mentioned in the service record) – ______________________________
______________________________
2. Application for the post - 1) Name of the Post - ______________________
2) Place - ______________________
3. Date of Birth - ______________________
4. Permanent Address - ______________________
______________________
______________________
______________________
5. Present / Correspondence Address - ______________________
______________________
______________________
______________________
6. Mobile Number - ______________________
7. Marital Status - ______________________

8. Gender - ______________________________

9. Email id - ______________________________

10. Date of Joining Police - ______________________________
Department & Post - Batch - ______________________________

11. Date of Retirement - ______________________________

12. Last Basic drawn - ______________________________

13. Educational Qualifications - ______________________________

| Sr. No. | Qualification | Name of the institute | Board/ University | Year of Passing | Percentage | Class |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | SSC or Diploma | | | | | |
| 2. | HSC | | | | | |
| 3. | Graduation (B. A, BSc, B. Com etc.) | | | | | |
| 4. | Post-Graduation/ Other Qualification if any | | | | | |

**14. <u>Details of Postings:- (Mention last 15 years posting only)</u>**

| Sr. No. | Name of the Police Station / Division | Post (PSI / API / PI / ACP) | Period from to |
|---|---|---|---|
| 1. | | | |
| 2. | | | |
| 3. | | | |
| 4. | | | |
| 5 | | | |

Total Service / Experience: ____________ Y (Year) ________M (Months) ___________ D (days)

15. Total Rewards :- ______________________________

16. Punishments if any :- 1) Minor :- ______________________________

2) Major :- ______________________________

17. Details of pending departmental enquires if any :- ______________________________

______________________________________________

18. Details of criminal cases if any and Status of the case :- ______________________________

______________________________________________

## **Declaration**

I have read carefully all instructions and I, hereby, declare that, all information mentioned in this application and in its accompaniments is true, complete and correct to the best of my knowledge and belief. I know and accept that in the event of any information being found false, incomplete, or incorrect, my candidature/ appointment is liable to be cancelled/ terminated at any stage.

Date :

Place

(Signature of Applicant)

**Enclosures :**

*******